आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२५ जानेवारी २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत जगातली तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था झाल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- राज्यासह देशभरात राष्ट्रीय मतदार दिन साजरा

- प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, संध्याकाळी ७ वाजता राष्ट्रपती देशाला संबोधित करणार

- अग्निशमन दल, होमगार्ड, नागरी संरक्षण आणि सुधारगृह सेवांमधल्या ९८२ कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकं प्रदान, राज्यातल्या ७५ जणांचा समावेश

**आणि**

- भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील टी ट्वेंटी सामन्यांच्या मालिकेतील तिसरा क्रिकेट सामना आज गुवाहाटी इथं खेळला जाणार

**<><><><><>**

भारत आज जगातली तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था झाली असून देशातल्या युवांनी नवोन्मेषाच्या क्षेत्रात केलेल्या कामाची नोंद इतिहासात होत आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज मन की बात या कार्यक्रमात केलं. देशात वेगानं वाढत असलेल्या स्टार्टअप्स क्षेत्राचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला.

***होल्ड... बाईट- नरेंद्र मोदी***

देशाची अर्थव्यवस्थाही वेगानं पुढे जात असून संपूर्ण जगाचं लक्ष भारतावर आहे. या काळात गुणवत्तेला प्राधान्य द्यायची गरज आहे, असं मत मोदी यांनी मांडलं. ज्या वस्तूंचं उत्पादन भारतात होईल, त्याचा दर्जा आणखी सुधारण्याचा संकल्प करायचं आवाहन त्यांनी केलं.

देशातल्या सर्व युवांनी वयाची १८ वर्षं पूर्ण केल्यानंतर मतदार म्हणून नोंदणी करावी, यामुळे भारताची लोकशाही बळकट होईल, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज मतदार दिवसाच्या निमित्ताने केलं.

भारत आणि मलेशिया यांच्यातल्या दृढ संबंधांवरही प्रधानमंत्र्यांनी भाष्य केलं. मलेशियात ५०० पेक्षा जास्त तमिळ शाळा असून तिथं या भाषेसोबतच इतर विषयही तमिळमध्येच शिकवले जातात, याचा आवर्जून उल्लेख त्यांनी केला. तसंच, मलेशिया-भारत वारसा सोसायटी करत असलेल्या कामाचंही त्यांनी कौतुक केलं.

गुजरातमध्ये बेचराजीच्या चंदनकी या गावातल्या सामुदायिक स्वयंपाकघरात संपूर्ण गावासाठी जेवण तयार होतं आणि सगळे गावकरी एकत्र बसून जेवतात. या अनोख्या परंपरेचं वर्णन प्रधानमंत्र्यांनी मन की बात कार्यक्रमात केलं. तसंच जम्मू-काश्मीरच्या अनंतनागमध्ये शेखगुंड या गावात वाढणारं व्यसनांचं प्रमाण पाहून सर्व गावकऱ्यांना एकत्र करून अशा पदार्थांची विक्रीच बंद पाडणाऱ्या मीर जाफर यांचाही गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला. याशिवाय, नद्यांचं पुनरुज्जीवन, पर्यावरण संवर्धन, दुष्काळ निवारण, स्वच्छता, भरडधान्याला प्रोत्साहन इत्यादी क्षेत्रांमध्ये भरीव योगदान देणाऱ्या, देशाच्या विविध भागांतल्या नागरिकांचं त्यांनी कौतुक केलं.

पुढच्या महिन्यात होणाऱ्या इंडिया एआय समिटमध्ये तंत्रज्ञान क्षेत्रातले तज्ञ जगभरातून एकत्र येणार आहेत, असं मोदी यांनी नमूद केलं. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातली भारताची प्रगती आणि यश या परिषदेतून जगासमोर येईल, असा विश्वास त्यांनी आजच्या ‘मन की बात’चा समारोप करताना व्यक्त केला.

**<><><><><>**

देशभरात आज १६ वा राष्ट्रीय मतदार दिन साजरा होत आहे. भारतीय लोकशाहीत नागरिकांची मध्यवर्ती भूमिका ठळकपणे मांडणारी My India, My Vote ही यंदाची संकल्पना आहे. भारत निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाल्याच्या स्मरणार्थ हा दिवस पाळला जातो. मतदारांचं महत्त्व अधोरेखित करणं, निवडणूकांविषयी जनजागृती वाढवणं आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहित करणं हा या दिनाचा उद्देश आहे.

या निमित्तानं नवी दिल्ली इथं झालेल्या राष्ट्रीय कार्यक्रमाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संबोधित केलं. मतदार ओळखपत्रामुळं मतदारांना जगातल्या सगळ्यात मोठ्या लोकशाहीत सक्रिय भागिदार होण्याचा अधिकार मिळतो असं त्यांनी सांगितले.

- **- होल्ड बाईट राष्ट्रपती - -**

मताधिकाराचा हक्क बजावणं हे राजकीय जागृतीचं माध्यम असल्याचं बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते याचं स्मरण राष्ट्रपतींनी करून दिलं. मतदानाच्या अधिकारासोबतच, प्रत्यक्ष मतदान करणंही तितकंच महत्वाचं असतं असं त्यांनी सांगितलं. देशाचे मतदार प्रलोभन, खोटी माहिती तसंच दुष्प्रचाराला न भूलता आपल्या विवेकबुद्धीनं देशाच्या निवडणूक व्यवस्थेला सुदृढ बनवतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. निवडणूक आयोगाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे देशाच्या लोकशाहीच्या प्रतिष्ठेत सातत्यानं भर पडत राहील असं त्या म्हणाल्या.

यावेळी राष्ट्रपतींनी निवडणूक प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर, मतदार जागृती, आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी अशा विविध श्रेणींमधे पुरस्कार प्रदान केले. यात मतदारांच्या जागृतीसाठी उत्कृष्ट मोहीम राबवल्याबद्दल आकाशवाणी वृत्तविभागाला इलेक्ट्रॉनिक रेडिओ श्रेणीत पुरस्कार देण्यात आला. आकाशवाणीचे महासंचालक राजीव कुमार जैन यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

याशिवाय, मतदार जनजागृतीसाठी निवडणूक आयोगातर्फे विविध उपक्रम राबवले जात असून, प्रथम मतदान करणाऱ्या युवकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आलं आहे.
दरम्यान, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी जबाबदार आणि जागरूक मतदानातून लोकशाही अधिक बळकट करण्याचं आवाहन केलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर, मनसुख मांडवीय यांनीही मतदार दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त नाशिकमध्ये आज सकाळी काढण्यात आलेल्या सायकल रॅलीत राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम आणि जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी सहभाग घेतला.

**<><><><><>**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, आज संध्याकाळी ७ वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू देशाला संबोधित करणार आहेत. त्यामुळे आकाशवाणी मुंबई केंद्रावरून रोज संध्याकाळी ७ वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र आज ६ वाजून ४५ मिनिटांनी प्रसारित होईल.

**<><><><><>**

प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस, अग्निशमन दल, होमगार्ड, नागरी संरक्षण आणि सुधारगृह सेवांमधील ९८२ कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकांनी सन्मानित करण्यात आलं आहे. १०१ कर्मचाऱ्यांना राष्ट्रपतींचं विशिष्ट सेवा पदक आणि ७५६ कर्मचाऱ्यांना गुणवत्तापूर्ण सेवा पदकं प्रदान केली गेली. समर्पित आणि निष्ठावान सेवेसाठी ही पदकं प्रदान केली जातात. यापैकी १२५ कर्मचाऱ्यांना शौर्य पदकं देण्यात आली असून ही दुर्मिळ शौर्यपूर्ण कृत्यांसाठी दिली जातात.

यात महाराष्ट्राच्या पोलीस आणि सुरक्षा दलातल्या ७५ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील अधिकारी कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या पदकांमध्ये ३१ शौर्यपदकं, उल्लेखनीय सेवेसाठीची ४ राष्ट्रपती पदकं आणि गुणवत्तापूर्ण सेवेसाठीच्या ४० पदकांचा समावेश आहे, या सन्मानानं शौर्यवान आणि सेवेत पराक्रमी कामगिरी करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांचं योगदान अधोरेखित केलं आहे.

सीबीआयमधल्या ३१ अधिकाऱ्यांना पोलीस पदकं प्रदान करण्यात आली. कोलकाता इथल्या आर. जी. कार वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर हत्याप्रकरण आणि विचारवंत नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणाच्या तपासाचं नेतृत्व करणाऱ्या अधिकाऱ्यांचा यात समावेश आहे. सीबीआयचे संयुक्त संचालक व्ही. चंद्रशेखर यांना राष्ट्रपतींचं विशिष्ट सेवा पदक देण्यात आलं असून, २५ अधिकाऱ्यांना गुणवत्तापूर्ण सेवा पदक जाहीर झालं आहे.
या सन्मानानं शौर्यवान आणि सेवेत पराक्रमी कामगिरी करणाऱ्या पोलीस आणि कर्मचाऱ्यांचं योगदान अधोरेखित केलं आहे.

**<><><><><>**

कर्तव्यावर असताना मद्यपान करणारे एसटीचे चालक आणि इतर कर्मचाऱ्यांना तातडीनं निलंबित करावं, असे स्पष्ट निर्देश परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आज दिले. मुंबईतल्या परळ रेल्वेस्थानकाला आज भेट देऊन त्यांनी चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांची पाहणी केली. यावेळी अनेक ठिकाणी मद्याच्या रिकाम्या बाटल्या आढळल्या, तसंच काही कर्मचाऱ्यांकडून मद्याचा दुर्गंध आल्याचं निदर्शनाला आल्यामुळे सरनाईक यांनी तिथं उपस्थित असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना धारेवर धरलं आणि संबंधितांची विभागीय चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करायचे निर्देश दिले.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या अलीकडच्या महापालिका निवडणुकांतील दारुण पराभवावरून काँग्रेसनं तातडीनं आत्मपरीक्षण करण्याची गरज असल्याचं ज्येष्ठ काँग्रेस नेते अनंत गाडगीळ यांनी म्हटलं आहे. पक्ष टिकून राहायचा असेल तर निष्ठावंत कार्यकर्ते आणि ग्रामीण मतदारांशी पुन्हा नातं जोडणं आवश्यक असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेसला केवळ २४ जागांवर समाधान मानावं लागलं, तर भाजप–शिवसेना युतीला स्पष्ट बहुमत मिळालं.

**<><><><><>**

श्री. गुरु तेग बहादुर साहीबजी यांच्या साडेतीनशेव्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड इथल्या मोदी मैदान इथं  शहिदी सत्संग सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी देशभरातून अनेक मान्यवर नांदेडमध्ये येत आहेत. दिल्लीचे उद्योग, अन्न आणि नागरी पुरवठा, पर्यावरण तसंच वनं मंत्री  मनजींदर सिंघ सिरसा तसंच आंध्रप्रदेशचे उपमुख्यमंत्री कोनिडला पवन कल्याण यांचं आज  नांदेड इथल्या गुरु गोविंदसिंघजी विमानतळावर आगमन झालं.

**<><><><><>**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर महामार्ग वाहतूक व्यवस्थापन प्रणाली अंतर्गत गॅन्ट्री अर्थात वाहतूक नियंत्रणासाठीची लोखंडी चौकट उभारण्याचं काम २७  ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हाती घेण्यात आलं आहे. हे काम धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर  तसंच कारंजा, जिल्हा वाशिम या तालुक्यांच्या हद्दीत करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

अमरावती जिल्ह्यातल्या बहिरम इथं सातपुडा श्रीक्षेत्र बहिरम बाबा यात्रेच्या निमित्तानं आयोजित आमदार हिंदकेसरी बैलगाडा शर्यत रंगस मैदानात झाली. ही विदर्भातली प्रसिद्ध स्पर्धा यंदा यवतमाळ आणि हिंगोलीतल्या शेतकऱ्यांसोबतच संपूर्ण महाराष्ट्र, मध्यप्रदेशातल्या स्पर्धकांच्या सहभागानं रंगतदार झाली.

**<><><><><>**

मुंबईत पश्चिम रेल्वेमार्गावरच्या मालाड रेल्वे स्थानकावर धक्का लागल्याच्या कारणानं एका तरुणानं दुसऱ्या व्यक्तीचा खून केला. मृत व्यक्ती ही एन.एम. महाविद्यालयात प्राध्यापक

म्हणून कार्यरत होती. ट्रेनमधून उतरत असताना धक्का लागल्याच्या वादातून ही घडना घडल्याचं पोलीसांनी सांगितलं. घटनेनंतर आरोपी फरार झाला होता, त्यानंतर पोलीसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करून आरोपीला वसई रेल्वे स्थानकातनं ताब्यात घेतलं आहे.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील टी ट्वेंटी सामन्यांच्या मालिकेतील तिसरा क्रिकेट सामना आज गुवाहाटी इथं खेळला जाणार आहे. संध्याकाळी सात वाजता सामना सुरू होणार आहे. या मालिकेत भारताने २-० अशी आघाडी घेतली असून आजचा सामना जिंकणं भारताला मालिका जिंकण्याच्या दृष्टीने महत्त्वाचं आहे.

**//<><><><><>//**